स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, 539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004**

**दूरध्वनी क्र.** (0231) 2696101 / 2 / 3 **Website-www.sscboardkolhapur.in Email-divsec.kop@gmail.com**

क्र. कोविमं/लेखा/परीक्षा फी मार्च २०२१/1346 दिनांक : १४ / ०८ / २०२३

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय : माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२१ च्या इ.१० वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परताव्याबाबत.**

**संदर्भ :** १) राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./लेखा-६/३४८९,दि.०७/०९.०८.२०२३ चे पत्र
२) या कार्यालयाचे दिनांक ६४१, दिनांक १६.०६.२०२३ चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२१ इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना रु.५९/- व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२१ इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना रु.९४/- परीक्षा शुल्क परतावा करणेसाठी दिनांक १२.११.२०२१ ते दिनांक २८.११.२०२२ या कालावधीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या डेटानुसार संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परत करणेबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा केला गेला नाही अशा विद्यार्थ्यांची रक्कम परत करण्यासाठी इ.१० साठी **http://feerefund.mh-ssc.ac.in** व इ.१२ साठी **http://feerefund.mh-hsc.ac.in** या संकेतस्थळावर शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा **username** व **password** टाकून **login** करावे. ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत करावयाचे आहे, ते विद्यार्थी **select** करून **submit** करावे. त्यानंतर संगणक प्रणाली शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास **bank challan** उपलब्ध करून देईल. सदरील चलनाची प्रिंट काढून कोणत्याही बँकेत रक्कम धनादेश व चलनाद्वारे भरता येते असे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले होते.

**माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२१ इ.१० वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परताव्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली असल्याने सदरील योजना बंद करण्यात आली आहे. तसेच ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाकडे शिल्लक राहिलेली परीक्षा शुल्काची रक्कम ICICI बँकेच्या त्याच खात्यामध्ये उपरोक्त ऑनलाईन प्रणालीद्वारे जमा करण्यात यावे.**

उपरोक्त प्रमाणे माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी कार्यवाही करावी.

**(डी. एस. पोवार)**
**विभागीय सचिव,**
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव : मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे-४

D/Ansar/Letter